# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. - ०२०- २५६०११८९/११९०
फॅक्स नं. - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ:- www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे- ४११ ००७.

संदर्भ क्रमांक :- आरक्षण/ओ-२२/४२९

दिनांक:- १८/०५/२०१२

प्रति,
मा.प्राचार्य / मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषय:- महाविद्यालयातील प्राचार्य / संचालक / शिक्षक पदांसाठी पात्र असलेल्या उमेदवारांच्या यादया संदर्भात.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये / संस्थांमध्ये, प्राचार्य / संचालक / शिक्षक पदांसाठी मागासवर्गीय पात्र उमेदवार उपलब्ध व्हावे याकरीता पुणे विद्यापीठ पदव्युतर परीक्षा उत्तीर्ण झालेले व सदर पदास लागणारी पात्रताधारण करीत असलेल्या मागासवर्गीय उमेदवारांची या कार्यालयात नाव नोंदणी करण्यात येते. या कार्यालयात डिसेंबर, २०१० पूर्वी नाव नोंदणी केलेल्या उमेदवारांच्या नोंदी रद्द करून नव्याने नाव नोंदणी करण्यात आलेली असून त्यानुसार पात्र उमेदवारांच्या विषयनिहाय यादया नव्याने तयार करण्यात आलेल्या आहेत. या कार्यालयाकडील तसेच सेवायोजन कार्यालय व इतर संबंधित कार्यालयाकडून पात्र उमेदवारांच्या यादया प्राप्त करून घेवून पदे भरण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

महाविद्यालये / संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून यादयांची मागणी करतांना या कार्यालयाकडून तपासून घेतलेले आरक्षण प्रमाणपत्र-अ व त्यानुसार वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीचे कात्रण मागणी पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे. मागणी केल्यानुसार पात्र उमेदवरांच्या याद्या ई-मेल व्दारे पाठविण्यात येणार असल्याने प्राचार्य / संचालक यांनी आपला ई-मेल आयडीचा पत्रात स्पष्टपणे उल्लेख करावा, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सहायक कुलसचिव
(आरक्षण कक्ष)